# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३५५/२०१०-११ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. लक्ष्मण मानाप्पा राठोड,<br>मु.पो. संख, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. लक्ष्मण मानाप्पा राठोड, मु.पो. संख, ता. जत, जि. सांगली यांनी आपले प्रतिनिधी श्री. हरिभाऊ खापरे यांजमार्फत मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. २८.१२.२०१० रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

ग्राहकाने वि.प.च्या संख उप विभागाकडे दि. १२.१.२०१० रोजी संख येथील गट क्र. ८९/१ मध्ये नवीन शेतीपंप वीज मागणीसाठी अर्ज केला. यासाठी भरावी लागणारी फी रु. ५०/- दि. १२.१.२०१० ला पावती क्र. ५३३७६७५ नुसार भरली. वितरण कंपनीने ग्राहकास आजतागायत चलन दिले नाही. तक्रारदाराने चौकशी केल्यानंतर या जागी पूर्वीची कोणाची तरी थकबाकी आहे, त्यामुळे वीज पुरवठा मंजूर करता येत नाही असे वि.प.ने सांगितले. तक्रारदाराने तक्रार क्र. ६०४ दि. १२.१०.२०१० ला अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दाखल केली, त्यामध्ये कक्षाने आजगातायत आदेश केला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत - चलन मिळावे व झालेल्या विलंबाबाबत कृती मानके विनियमानुसार भरपाई मिळावी. वितरण कंपनीच्या दाव्यानुसार थकबाकी असलेस माझा काहीही संबंध नाही हे जाहीर होवून मिळावे, कृती मानके विनियमानुसार जागेची पहाणी करणे व त्यानंतर वीज मंजुरी न दिल्याने वि.प.ने कृती मानके विनियमाचा भंग केलेला आहे हे जाहीर होवून मिळावे अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या लेखी अहवाल नोटीस देवूनही मुदतीत दि. १७.१.२०११ पर्यंत मंचामध्ये दाखल केला नाही, तो दि. २४.३.२०११ ला मंचामध्ये प्राप्त झाला. त्यामध्ये श्री. लक्ष्मण मानाप्पा राठोड, रा. संख यांनी गट क्र. ४५/१ संख मध्ये शेतीपंपासाठी अर्ज केलेला आहे, पण सदरील गट क्रमांकामध्ये श्री. सुकुमा रेवाप्पा वाडकर ( जागेचा पहिला मालक ) ग्रा.क्र. २७०५४००४१२३४ यांची रु. २४२०७/- इतकी थकबाकी आहे. ज्या विहीरीवर हि थकबाकी आहे ती गट क्र. ४५/१ मध्ये असून त्याच्या शेजारी अवघ्या २०० फूटावर बोअरवर तक्रारदार कनेक्शन मागत आहेत. सदरील थकबाकी भरलेनंतरच त्यांना चलन देण्यात येईल. सदरील मागणी हि गट क्र. ४५/१ वर आहे पण नजरचुकीने पावतीवर गट क्र. ८९/१ असा पडलेला आहे. असे समजते की, श्री. सुकुमार रेवाप्पा वाडकर यांनी हि जमीन श्री. लक्ष्मण मानाप्पा राठोड यांना विकलेली आहे त्यामुळे हि बाकी कोणाची आहे हा कंपनीचा विषय असलेपेक्षा आज रोजी सदरील जागेमध्ये थकबाकी नसणे हा महत्वाचा मुद्दा आहे. म्हणून सदरील जागेची थकबाकी भरलेनंतर नियमाप्रमाणे चलन देण्यात येईल असे म्हटले आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. ७.३.२०११ ला घेण्यात आली. ग्राहक प्रतिनिधी हजर. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, श्री. देशपांडे, सहाय्यक अभियंता उपस्थित. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी थकबाकी श्री. वाडकरची ग्राहकाचा त्याच्याशी संबंध काय आहे हे वि.प. दाखवू शकत नाही. गट क्रमांक वेगळे आहेत. पर्यायाने कदाचित ग्राहक जबाबदार आहे असे गृहीत धरले तर अधिनियम १०.५ नुसार ठराविक कालावधीसाठी थकबाकीची जबाबदारी राहील. तक्रार मंजूर करावी. वि.प.ने चलन विलंबापोटी भरपाई द्यावी अशी मागणी केली. वि.प.तर्फे कागदपत्रे हजर करण्यास मुदत मागितली. ग्राहक हा खरेदीदार आहे असे सांगितले. दि. ७.१२.२०१० पर्यंत कागदपत्रे हजर करण्यास मुदत मागितली. दि. १०.३.२०११ पर्यंत कागदपत्रे/ माहिती दाखल केली नाही. ग्राहक प्रतिनिधींनी मंचासमोर सुनावणीचे दिवशी दि. ७.३.२०११ ला म्हणणे दाखल केलेल्या त्यामध्ये वि.प.च्या लेखी अहवालातील म्हणण्याला हरकत घेतली आहे व विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ५६.२ नुसार ही थकबाकी वसुलीयोग्य थकबाकी म्हणून सातत्याने दाखविली जात आहे काय ?

विद्युत पुरवठ्याची संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ च्या कलम १०.५ नुसार कायदेशीर वारसाला जास्तीत जास्त सहा महिन्या पर्यंतच्या कालावधीसाठी फक्त अशा जागेला पुरविण्यात आलेल्या विजेच्या चुकत्या न केलेल्या आकाराइतकीच मर्यादीत जबाबदारी राहील, ग्राहकाची श्री. वाडकर यांचे विहीरीपासून साधारण २०० फूट अंतरावरील बोअरवर वीज मागणी आहे असे म्हटले आहे. सोबत हक्काचे पत्रक व ७/१२ उतारा जोडला आहे. दि. २४.३.२०११ रोजी सुनावणीचेवेळी वि.प.ने कागदपत्रे देण्यास मुदत मागितली. वि.प.ने दि. ६.४.२०११ रोजी श्री. वाडकर यांचे विद्युत बील हजर केले.

वरील विवेचानावरुन खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होत आहेत.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे त्यांना चलन देणे योग्य व कायदेशीर होईल काय ?

उत्तर : होय

२) ग्राहकाची विलंबापोटी भरपाई मिळण्याची मागणी मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे

## कारणमिमांसा

उभयबाजूंच्या कथनानुसार तक्रारदार यांनी वि.प.कडे दि. १२.१.२०१० ला शेतीपंप वीज मागणी अर्ज देवून त्यासाठी भरावी लागणारी फी रु. ५०/- दि. १२.१.२०१० ला पावती क्र. ५३३७६७५ नुसार भरली. वि.प.ने ग्राहकास मंचात उत्तर दाखल होईपर्यंत थकबाकीपोटी तुमचा अर्ज चलन देणेबाबत विचारात घेता येणार नाही असे कळविले नाही , हे का कळविले नाही हे वि.प.चे फिल्ड ऑफीसरच जाणोत. लेखी अहवालात मात्र ग्राहकाने श्री. सुकुमा रेवाप्पा वाडकर यांच्याकडून जमीन खरेदी केली आहे त्या जमिनीचा गट क्र. ४५/१ असून तेथील कनेक्शनवर (ग्रा.क्र. २७०५४००४१२३४) रु. २४२०७/- इतकी थकबाकी आहे असे नमूद केले आहे. येथे हे स्पष्ट झाले की, गट क्र. ४५/१ मधील विहीरीवर जेथे श्री. वाडकर यांचे कनेक्शन आहे तेथे वीज जोडणी मागितली नसून त्यापासून २०० फूट अंतरावर स्वतंत्र वीज जोडणी मागितली आहे. ७/१२ उता-यावरुन व फेरफार उता-यावरुन ग्राहकाने श्री. वाडकर यांच्याकडून जमीन खरेदी केली आहे व स्वतंत्र बोअर मारले आहे. त्यामुळे श्री. राठोड हे पूर्वीचे मालक श्री. वाडकर यांच्या थकबाकी बाबत कसे जबाबदार आहेत हे अनाकलनीय आहे. वि.प.ने श्री. वाडकर यांचे सप्टेंबर २०१० ते डिसेंबर २०१० चे बील दाखल केले आहे **त्यात श्री. वाडकर यांनी थकबाकी भरल्याचे दाखविले आहे. (रु. १२,०१०/-).** त्यामुळे श्री. खापरे यांच्या म्हणण्या प्रमाणे ग्राहकाचा वीज मागणीचा अर्ज वि.प.ने जाणूनबुजून प्रलंबित ठेवला आहे. वि.प.ने कृती मानके विनियमातील तरतुदीचा भंग केला आहे. आपल्या म्हणण्यापुष्ट्यर्थ श्री. खापरे यांी मा. लोकपालांच्या केस क्र. ११८/२०१० मधील दि. २०.९.२०१० च्या आदेशाची प्रत जोडली आहे. त्यातील पॅरा ११ मध्ये मा.लोकपाल यांनी कृती मानके मा. आयोगाचे दि. २०.१.२००५ ला मंजूर केले, त्यानुसार -

Appendix A of the Maharashtra State Regulatory Commission (Standards of Performance of Distribution Licensee, Period for Giving Supply and Determination of Compensation) Regulation, २००५, approved by the Commission, on २०th January, २००५, mandates that the time period for completion of inspection of Appellant's premises from the date of receipt of application is ७ days.

त्यामध्ये वि.प.ने ग्राहकाचे वीज जोडणीचा अर्ज expedite करावा असे आदेश दिले आहेत. अर्थात मा. आयोगाने मंजूर केलेल्या सप्लाय कोड रेग्युलेशननुसारच. प्रस्तुत केस मध्ये अशा प्रकारचे ७ दिवसांत वि.प.ने इन्स्पेक्शन केले नाही व चलन देण्यात विलंब केला आहे. ग्राहक प्रतिनिधींनी मंचासमोर दाखल केलेल्या दि. ७.३.२०११ च्या अर्जावर वि.प.ने कुठलेही म्हणणे दिले नाही. कलम ५६.२ नुसार थकबाकी वसुली सातत्याने दाखविली आहे का ? याबद्दल खुलासा केला नाही. अर्थात याबद्दलच्या कार्यवाहीबाबत कुठलेही मत व्यक्त न करणे योग्य होईल. विद्युत पुरवठ्याची संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ च्या कलम १०.५ नुसार कायदेशीर वारसाला जास्तीत जास्त सहा महिन्या पर्यंतच्या कालावधीसाठी फक्त अशा जागेला पुरविण्यात आलेल्या विजेच्या चुकत्या न केलेल्या आकाराइतकीच मर्यादीत जबाबदारी राहील, यातील तक्रारदार श्री. वाडकर यांचे कनेक्शन आहे त्यापासून साधारण २०० फूट अंतरावरील स्वतंत्र बोअरवर तक्रारदाराची वीज जोडणी मागणी आहे, त्यामुळे कलम १०.५ खाली जबाबदारी येणार नाही हे ग्राहक प्रतिनिधींचे म्हणणे प्रथमदर्शनी योग्य व कायदेशीर वाटते. अर्थात वि.प.ने कलम १०.५ खाली ६ महिन्यांची थकबाकी भरणेस तक्रारदारास सांगितले असेही म्हटले नाही , त्यामुळे विद्युत पुरवठ्याची संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ चे कलम १०.५ लागू होणार नाही असे मंचाचे मत झाले आहे.वि.प.ने मुदतीत जागेची तपासणी न केल्याचे किंवा ग्राहकाचा अर्ज का प्रलंबित ठेवला याबद्दल कु ठलेही स्पष्टीकरण दिले नाही किंवा लेखी कळविले नाही, त्यामुळे चलन देण्यास विलंब झाला आहे व कृती मानके विनियमतील तरतुदीचा भंग झाला आहे. त्यामुळे ग्राहकास विलंबापोटी भरपाई मिळण्याचा हक्क आहे. कृती मानके विनियम व परिशिष्ट अ मधील तरतुदीनुसार ग्राहकास चलन देण्यास झ ालेल्या विलंबाबद्दल प्रति आठवडा रु. १००/- देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे व ग्राहकाचा तो हक्क आहे. त्यामुळे अर्जदाराने प्रोसेसिंग फी भरलेच्या तारखेपासून म्हणजे दि. १२.१.२०१० पासून चलन देईपर्यंतच्या कालावधीसाठी वि.प. ग्राहकास भरपाई देण्यास जबाबदार आहे व ग्राहकाचा तो हक्क आहे. मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.
२) वितरण कंपनी संख उप विभाग यांनी ग्राहकास त्वरित चलन द्यावे. तसेच दि. १२.१.२०१० पासून चलन देईपर्यंतच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रुञ १००/- प्रमाणे भरपाई ग्राहकास द्यावी. सदर भरपाईचे रकमेचे समायोजन वीज जोडणीनंतर दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम ग्राहकास रोखीने द्यावी.
३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बाद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.